# राष्ट्रीय आरोग्य अभियान, अलिबाग-रायगड.
## पदभरती जाहिरात दि. १६/०२/२०२६

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने दि.२९/०६/२०२६ रोजी पर्यंतच्या कालावधीसाठी खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

⟹ **दर महिन्याच्या ०५ व २० तारखेला थेट मुलाखतीव्दारे :-**

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती स्तर | मानधन प्रति महिना | एकुण पदे | अनुभव | आरक्षणानुसार जात प्रवर्ग | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | Paediatricians (IPHS) | M.D. Paed/ DCH/DNB, with Valid MMC Registration | जि.रु. अलिबाग-१ उप.जि.रु.माणगाव-१, उप.जि.रु.पेण-१, उप.जि.रु.रोहा-१, ग्रा.रु.महाड-१ | 85,000/- (पुर्णवेळ+ करीता Incentives) | ०५ | कमीत कमी १ वर्ष बालरोगतज्ञ या पदावर काम केल्याचा अनुभव. | तात्पुरत्या स्वरुपात | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष |
| 2 | Orthopaedics Surgeon (IPHS) | MS Ortho/ D Ortho, with Valid MMC Registration | जि.रु. अलिबाग-१, उप.जि.रु.माणगाव-१, उप.जि.रु.पनवेल-१ | 60,000/- (पुर्णवेळ करीता+ Incentives) | ०३ | कमीत कमी १ वर्ष अस्थिरोगतज्ञ या पदावर काम केल्याचा अनुभव. | | |
| 3 | Surgeon (IPHS) | M.S.(Gen.), with Valid MMC Registration | उप.जि.रु.पनवेल-१ | 60,000/- (पुर्णवेळ करीता+ Incentives) | ०१ | कमीत कमी १ वर्ष सर्जन या पदावर काम केल्याचा अनुभव. | | |
| 4 | Cardiologist (NPCDCS) | M.B.B.S MD with Valid MMC Registration | जि.रु. अलिबाग-१ | 125000/- | ०१ | कमीत कमी १ वर्ष Cardiologist या पदावर काम केल्याचा अनुभव. | | |

Scanned with ACE Scanner

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती स्तर | मानधन प्रति महिना | एकुण पदे | अनुभव | आरक्षणानुसार जात प्रवर्ग | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 5 | Physician/ Consultant Medicine **(IPHS, NCD)** | M.D. Medicine/ DNB, with Valid MMC Registration | आय.पी.एच.एस. कार्यक्रमाकरीता जि.रु. अलिबाग- १ उप.जि.रु. माणगाव-१, उप.जि.रु.पनवेल-१, उप.जि.रु.रोहा-१ | 60,000/- (पुर्णवेळ करीता + Incentives) | ०३ | कमीत कमी १ वर्ष भिषक या पदावर काम केल्याचा अनुभव. | तात्पुरत्या स्वरुपात | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष |
| | | | एन.पी.सी.डी.सी.एस., पॅलेटिव्ह केअर, एन.पी.एच.सी.ई. कार्यक्रमांतर्गत जि.रु.अलिबाग - ३ | 75,000/- | ०३ | | | |
| 6 | Radiologist (IPHS) | M.D.(Rad.)/ DMRD, with Valid MMC Registration | उप.जि.रु. माणगाव-१, उप.जि.रु. श्रीवर्धन-१, | USG- Rs.400/-, CT Scan- Rs.400/-, X-Ray- Rs.50/- (ऑन कॉल बेसिस) | ०२ | कमीत कमी १ वर्ष क्ष-किरण विशेषतज्ञ या पदावर काम केल्याचा अनुभव. | | |
| 7 | Ophthalmologists (IPHS) | MS Ophthalmology /DOMS, with Valid MMC Registration | जि.रु. अलिबाग- १ | Catarct Surgery- Rs.500/- Glaucoma -Rs.700/- Enucleation-Rs.500/ Squint- Rs.2000/- Other Minor n Surgery - Rs.500/- (ऑन कॉल बेसिस) | ०१ | कमीत कमी १ वर्ष नेत्रशल्य चिकित्सक या पदावर काम केल्याचा अनुभव. | | |

Scanned with ACE Scanner

❖ *अटी व शर्ती -*

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती दि. २९/०६/२०२६ पर्यंत राहील.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व उमेदवाराची निवड झालेनंतर नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सकांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल **याशिवाय निवड झालेनंतर संबधित पदावर हजर होताना उमेदवाराने वर्तणूकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.**

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा वर नमूद तक्त्यानुसार एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

६) जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो व रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप - अलिबाग यांनी राखून ठेवले आहेत.

७) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत. एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत, पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

८) वर नमूद अ.क्र.१ ते ७ पदांच्या शैक्षणिक अर्हता व अनुभव यामध्ये राज्यस्तरीय मार्गदर्शक सुचना तसेच निवड समितीचे आयत्या वेळी घेतलेल्या निर्णयानुसार बदल होवू शकतो याची सर्व इच्छुक उमेदवारांनी नोंद घ्यावी.

०९) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांचे नोटीस बोर्डवर व रायगड जिल्हा परिषद यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

१०) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रियेची मेरिट लिस्ट तयार करताना पात्र उमेदवारांच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाचे गुण + उच्च शैक्षणिक अर्हतेचे गुण + NHM, शासकिय, निमशासकीय संस्था, विभाग, शासन अंगीकृत संस्था यांचा अनुभव + मुलाखत (कौशल्य चाचणी) या बाबींचे गुण एकत्र करुन गुणवत्ता यादी तयार करणेत येईल.

११) निवड यादीतील गुणक्रमाकांचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१२) वरील पैकी कौन्सिल प्रमाणपत्र आवश्यक असणाऱ्या सर्व पदांकरीतांचे संबंधित कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र, नोंदणीचे नुतनीकरण व कौन्सिलचे आयकार्ड सादर करणे बंधनकारक राहील.

१३) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र.राआसोम/कोविड- १९पदभरती/१९६२-१९७०/२०२० दि.१५/०४/२०२० मधील मार्गदर्शक सुचनांनुसार जाहिरातीत नमुद केलेल्या विशिष्ट मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर गुणानुक्रमे सर्वात वर असणाऱ्या इतर कोणत्याही मागास प्रवर्गाच्या उमेदवाराची निवड करणेत येईल एकही मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसलेस खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करणेत येईल.

Scanned with ACE Scanner

१४) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१५) वयोमर्यादा :- १८ वर्षे वय पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात. अभियान अंतर्गत सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षापर्यंत शिथिल राहील, एम.बी.बी.एस. विशेषतज्ञ व अति विशिष्ट विशेषतज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्षे राहिल. तसेच रुग्ण सेवेशी संबंधित इतर पदांची वयोमर्यादा ६५ वर्षे राहिल. वय वर्ष ६० नंतर मा. जिल्हा शल्यचिकीत्सक यांचेकडील शारीरिक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१६) सदरहु भरती प्रक्रिया ही थेट मुलाखतीद्वारे राबविणेत येणार असुन तदनंतर निवड यादी प्रसिध्द करणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांचे नोटीस बोर्डवर तसेच रायगड जिल्हा परिषद यांचे http://www.zpraigad.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१७) उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या विहीत नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे -

- विहीत नमुन्यातील अर्ज
- संबंधित पदाशी निगडित शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (१० वी, १२ वी व पदवी, पदव्युत्तर पदवीच्या सर्व सत्रांच्या गुणपत्रिका)
- शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला
- NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्थेतील व खाजगी संस्थेमध्ये सदर पदाबाबत अनुभवाचा दाखला
- जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र
- संबंधित पदाकरिता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट), नोंदणीचे नुतनीकरण व कौन्सिलचे आयकार्ड
- पासपोर्ट आकाराचे २ फोटो
- उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास शासनाचे राजपत्र
- आधारकार्ड
- पॅनकार्ड
- लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र

१८) उमेदवाराच्या नावात बदल झाला असलेस त्याबाबतचे शासनाचे राजपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१९) जाहिरातीत नमुद विशेषतज्ञ पदांकरीता भरती प्रक्रिये मध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रत्येक महिन्याच्या दि.०५ व दि.२० तारखेस मुलाखती (कौशल्य चाचणी) आयोजित करणेत येतील याची नोंद घ्यावी.

Scanned with ACE Scanner

२०) याशिवाय नियुक्त आदेश स्विकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या मुळप्रती सादर करणे बंधनकारक राहील.

२१) **उमेदवारांच्या पुर्वीच्या कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकिय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.**

**२२) कामावर रुजू होताना उमेदवाराने सादर केलेल्या माहितीची पडताळणी होणार असल्याने, त्यात काही अनियमितता आढळल्यास नियुक्ती आदेश रद्द करणेत येतील.**

२३) राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्गदर्शक सुचनांनुसार दि.२३/०७/२०२० पासून दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार सदर पदभरती करीता अर्ज करणेस पात्र ठरणार नाहीत.

२४) राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्गदर्शक सुचनांनुसार अर्ज करणाऱ्या उमेदवाराने यापूर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये काम केले असल्यास व त्याची अकार्यक्षमता/अनियमिततेच्या कारणामुळे सेवा समाप्त करणेत आली असल्यास, सदर पदभरती करीता अशा उमेदवाराचा विचार केला जाणार नाही.

२५) निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकीय निकड लक्षात घेऊन पदस्थापनेचे ठिकाण अंतिम करण्याचा अधिकार निवड समिती राखुन ठेवत आहे.

२६) आयपीएचएस विभागांतर्गत पुर्णवेळ कार्यरत पदांसाठी मानधनासमवेत प्रोत्साहन भत्ता देय राहिल. प्रोत्साहन भत्ता वेळोवेळी वरिष्ठ स्तरावरुन प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचना तसेच मा. जिल्हा शल्य चिकित्सक, जि.रु. अलिबाग यांनी निश्चित केल्याप्रमाणे अदा करण्यात येईल.

दिनांक :- १६/०२/२०२६
ठिकाण :- अलिबाग

सदस्य
निवड समिती
तथा,
जिल्हा शल्य चिकित्सक ,
जिल्हा रुग्णालय, अलिबाग

PHN

सदस्य सचिव
निवड समिती
तथा,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

अध्यक्ष,
निवड समिती
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

Scanned with ACE Scanner

Annexure II- 2 Application Format

# National Health Mission, Maharashtra

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र

**Recruitment Process for Various Posts for Advertisement No. :NHM/08/2023**

जाहिरात क्रमांक : NHM/08/2023 साठी विविध पदांसाठी भरती प्रक्रिया

| अर्ज क्र (Application No) |
|---|
| NHM/08/2023/ |

| | |
|---|---|
| इंग्रजीत नाव (FullName in English) | |
| मराठीत नाव (FullName in Marathi) | |
| जर नाव बदलले असेल तर इंग्रजीत बदलले पूर्णनाव (If Name Changed, Changed FullName in English) | |
| वडिलांचे/पालकांचे नाव (Father's/Guardian's FullName) | |
| आईचे नाव (Mother's FullName) | |
| लिंग (Gender) | |
| वैवाहिक स्थिती (Marital Status) | |
| MCSR (लहान कुटुंबाची घोषणा) नियम, 2005 नुसार तुम्ही पात्र आहात का? (Are you Eligible according to MCSR (Declaration of Small Family) Rules, 2005 ?) | |
| प्रवर्ग (Category) | |
| जात (Caste) | |
| पोटजात (Sub-Caste) | |
| तुम्हाला कोणत्या प्रवर्गातून अर्ज करायचा आहे ? (From which Category you want to apply ?) | |
| ई-मेल आयडी (Email ID) | |
| मोबाईल क्र (Mobile No) | |
| जन्मतारीख (Date of Birth) | |
| आधार क्र (Aadhaar No) | |



Scanned with ACE Scanner

| | |
|---|---|
| पत् रव् यवहाराचा पत् ता (Correspondence Address) | |
| कायमचा पत्ता (Permanent Address) | |
| तुमच्याकडे महाराष्ट्राचे वैध अधिवास प्रमाणपत्र आहे का? (Whether You have valid Domicile Certificate of Maharashtra?) | |
| राष्ट्रीयत्व (Nationality) | |
| तुम् हीराष् ट् रीय आरोग् य अभयिानाचे कर् मचारी आहे का? (Are you employee of National Health Mission ?) | |
| MS-CIT किंवा समतुल्य प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे का? (Has Successfully Completed MS-CIT or Equivalent Training?) | |
| मराठीचे पुरेसे ज्ञान आहे का? (Whether Possesss Adequate Knowledge of Marathi?) | |
| जाहिरातीत नमूद केलेले पदावर दिलेल्या ठिकाणांपैकी तुमचे पसंतीचे ठिकाण (Your preferred location from among the locations mentioned in the advertisement | |

**शैक्षणिक/तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रम माहिती तपशील (Details of Educational/Technical/Professional Course Information) :**

| परीक्षा स्तर (Examination Level) | परीक्षा (Examination) | उत्तीर्ण वर्ष (Passing Year) | एकूण गुण मिळाले (Total Marks Obtained) | टक्केवारी (Percentage) | ग्रेड (असल्यास) (Grade [If Any]) |
|---|---|---|---|---|---|
| बोर्ड/युनिवर्सिटी (Board/University) | विशेष विषय (असल्यास) (Specialisation [if Any]) | | एकूण गुण (Total Out Of Marks) | ग्रेड अथवा श्रेणी नमूद आहे का? (mention Grade or Category instead of Marks) | समतुल्य रूपांतरित टक्केवारी (equivalent converted Percentage) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |



Scanned with ACE Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

अनुभवाचा तपशील (Details of Experience Information) :

| संस्थेचा प्रकार (Type of Organisation) | संस्थेचे नाव आणि पत्ता (Organisation Name and Address) | तारखेपासून (From Date) | एकूण अनुभव(Total Experience) | नियुक्तीचे स्वरूप (Nature of the Appointment) |
|---|---|---|---|---|
| पद (Post Held) | | तारखेपर्यंत (To Date) | | वेतन तपशील (Salary Detail) |
| | | | | |
| | | | | |

आपण अर्ज केलेली पदे (The Posts you have applied for) :

| अर्ज केलेली पदे (Post Applied) |
|---|
| |

अर्ज फी म्हणून तुमच्याकडून ऑनलाइन रक्कम प्राप्त झाली (Online Amount Received from you as Application Fees) :

| व्यवहाराची तारीख (Transaction Date) | व्यवहार आयडी (Transaction ID) | रक्कम (Amount) |
|---|---|---|
| | | |
| | एकूण रक्कम (Total Amount) | |

आपण आपलोड केलेल्या कागदपत्रांची यादी (List of documents you have uploaded) :



Scanned with ACE Scanner

| अनु. क्र (Sr. No) | अपलोड केलेल्या कागदपत्रांचा तपशील (Details of documents uploaded) |
|---|---|
| 1 | रुंदी 100 पिक्सेल आणि उंची 140 पिक्सेल असलेला अर्जदाराचा फोटो (Applicant Photo having Width 100 Pixel and Height 140 Pixel) |
| 2 | रुंदी 100 पिक्सेल आणि उंची 50 पिक्सेल असलेली अर्जदाराची स्वाक्षरी (Applicant Signature having Width 100 Pixel and Height 50 Pixel) |
| 3 | आधार कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स / पॅन कार्ड / पासपोर्ट सारखा फोटो आयडी (Photo ID Like Aadhar Card / Driving License / PAN Card / Passport) |
| 4 | वयाचा पुरावा - शाळा सोडल्याचा दाखला (Proof of Age - School Leaving Certificate) |
| 5 | जातीचा दाखला (Caste Certificate) |
| 6 | जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) |
| 7 | अद्यावत नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र (Updated Non Cremy Layer Certificate) |
| 8 | अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) |
| 9 | एमएस-सीआयटी किंवा समकक्ष कोर्स प्रमाणपत्र (MS-CIT or Equivalent Course Certificate) |
| 10 | लहान कुटुंब घोषणापत्र (Small Family Declaration) |
| 11 | अर्जातील नावाचा पुरावा एस. एस. सी. अथवा तत्सम शैक्षणिक अहर्ता (Proof of name in application form (S.S.C. or equivalent Educational Qualification) |
| 12 | राष्ट्रीय आरोग्य मिशन आस्थापनेवरील कर्मचारी असल्याचा पुरावा (Proof of being an Employee of the National Health Mission establishment ) |
| 13 | शैक्षणिक पात्रता टॅबमध्ये नमूद केलेली सर्व बोर्ड/पदवी प्रमाणपत्रे एकाच पीडीएफ फाइलमध्ये अपलोड करा (Upload All Board/Degree Certificates which are mentioned in Educational Qualification Tab in Single PDF File) |
| 14 | अनुभव टॅबमध्ये नमूद केलेली सर्व अनुभव प्रमाणपत्रे एकाच पीडीएफ फाइलमध्ये अपलोड करा (Upload All Experience Certificates which are mentioned in Experience Tab in Single PDF File) |

## DECLARATION

मी,

यादवारे,

भरलेली संपूर्ण माहिती माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. मी कोणतीही भौतिक माहिती लपवलेली नाही, येथे सादर केलेली कोणतीही माहिती फसवी, चुकीची किंवा असत्य आढळल्यास, होण्यास जबाबदार असून पदावरील निवड देखील रद्द होण्यास जबाबदार आहे. आणि मी त्यांचे पालन करण्यास सहमत आहे. मी यादवारे या नियमांची संपूर्ण कायदेशीरता, वैधता आणि शुद्धता स्वीकारतो.



Scanned with ACE Scanner

मला समजते की हा अर्ज सबमिट करून मी या सर्वांची शुद्धता, वैधता आणि/किंवा न्याय्यता स्वीकारली आहे. आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याचे वचन घेतो, त्यात अयशस्वी झाल्यास माझा निवडीचा दावा मंजूर केला जाणार नाही. मी दस्तऐवज पडताळणीच्या वेळी तसेच निवड प्रक्रियेच्या वेळी नियमांनुसार सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करण्याचे वचन घेतो, असे न झाल्यास माझा निवडीचा दावा मंजूर केला जाणार नाही असे मला समजते.

I,hereby,solemnly and sincerely affirm that each and every statement made and the entire information filled in the above online application form is true and correct to the best of my knowledge. I have not concealed any material information, however if any information submitted herein is found fraudulent, incorrect or untrue, I understand that I am liable to criminal prosecution and my selection to the Post is also liable to be cancelled. I have carefully read the rules & regulations of Recruitment and I agree to abide by them. I hereby accept in entirely the legality, validity and correctness of these rules. I understand by submitting this application I have accepted the correctness, validity and/or justifiability of all these and that. I undertake to upload all the required Documents, failing which I understand that my claim for selection shall not be granted. I undertake to submit all the required original certificates at the time of Document Verification as well as at the time of selection process as per the rules, failing which I understand that my claim for selection shall not be granted.

**Online Application Submit Date :**

**Signature of Applicant**

Scanned with ACE Scanner

# प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................................

श्री......................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,.......................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी .......................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-



Scanned with ACE Scanner